महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक:तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२२/औषधनिर्माणशास्त्र पदविका/८४४ दिनांक :३०/०९/२०२२

**प्रवेशासाठीचे वेळापत्रक : अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक वाढविणेबाबत**

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रथम वर्ष पोस्ट एचएससी (बारावी नंतरचा) औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम**

राज्यातील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थाना प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली (PCI) यांची मान्यता असणे अनिवार्य आहे. काही विद्यमान (Existing) औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थाना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु ठेवण्यास पीसीआयची मान्यता अद्यापपर्यंत मिळालेली नाही. पीसीआय यांनी त्यांचे परिपत्रक क्र. 14-56/ 2022-PCI/13107 दि. २९/०८/२०२२ अन्वये विद्यमान संस्थाची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी मान्यता देण्याची कार्यवाही पीसीआयद्वारे सुरु असल्याचे व सदरील कार्यवाही पूर्ण होण्यासाठी आणखी काही अवधी लागण्याचे कळविले आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पोस्ट एचएससी पूर्णवेळ <u>औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम</u> राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे आणि अर्ज निश्चित करणे या प्रक्रियेच्या अंतिम दिनांकास मुदतवाढ देण्यात येत आहे.

**महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय उमेदवारांसाठी प्रवेश प्रक्रियेचे टप्पे आणि सुधारित तारखा खालीलप्रमाणे आहेत.**

| अनु. | प्रक्रिया | वेळापत्रक | |
|---|---|---|---|
| | | सुरुवात तारीख | सुधारित अंतिम तारीख |
| १. | प्रवेशप्रक्रियेसाठी उमेदवारांद्वारे संकेतस्थळावरुन अर्ज छाननीची योग्य पद्धत (ई-स्क्रूटनी / प्रत्यक्ष स्क्रूटनी) निवड करुन ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे. (महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय उमेदवारांसाठी) | ०९-०६-२०२२ | ०७*-१०-२०२२ |
| २. | प्रवेशासाठी कागदपत्रांची पडताळणी आणि अर्ज भरल्याची निश्चिती करणे. (ई-स्क्रूटनी / प्रत्यक्ष स्क्रूटनी) | ०९-०६-२०२२ | ०७*-१०-२०२२ |
| * प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरू ठेवल्या जातील. दि. ०७-१०-२०२२ नंतर ई-स्क्रूटनी पद्धतीद्वारे किंवा प्रत्यक्ष स्क्रूटनी पद्धतीद्वारे नोंद होणारे, पडताळणी व निश्चित होणारे अर्ज संस्था स्तरावरील व कॅपव्यतिरिक्त जागांसाठीच विचारात घेतले जातील. | | | |
| ३. | महाराष्ट्र राज्य /अखिल भारतीय उमेदवारांसाठी संकेतस्थळावर तात्पुरत्या गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे. | ०९-१०-२०२२ | |
| ४. | सर्व प्रकारच्या उमेदवारांसाठी तात्पुरत्या गुणवत्ता याद्यामध्ये तक्रार, असल्यास त्या सादर करणे. | १०-१०-२०२२ | १२-१०-२०२२ |
| ५. | महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय उमेदवारांसाठी संकेतस्थळावर अंतिम गुणवत्ता याद्या प्रदर्शित करणे. | १३-१०-२०२२ | |

टिप:

- ऑनलाईन अर्ज भरणे व निश्चित करणे याकरिता उमेदवारांच्या सोयीनुसार "ई-स्क्रूटनी" व "प्रत्यक्ष स्क्रूटनी" छाननी पद्धतीची माहिती, प्रवेशासाठीचे पात्रतेचे निकष, अर्ज भरण्यासाठीचे शुल्क, उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना इत्यादी सर्व बाबी संचालनालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या क्र. तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२२/बारावीनंतरचे प्रथम वर्ष पदविका/४६८, दि.७/६/२०२२ च्या प्रवेशासाठीच्या परिपत्रकानुसार राहतील.
- सुधारित वेळापत्रक (असल्यास) व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या कॅपच्या विविध फेरीकरिता विकल्प अर्ज (ऑप्शन फॉर्म) भरणे, कॅप जागावाटप, जागास्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इ.बाबतचे पुढील वेळापत्रक अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर घोषित केले जाईल व ते https://phd22.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- मदतकक्ष क्रमांक 8857954644, 9028625695 सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

Government of Maharashtra

# DIRECTORATE OF TECHNICAL EDUCATION,
## MAHARASHTRA STATE

3, MAHAPALIKA MARG, POST BOX NO. 1967, MUMBAI-400 001

Phone: 022-68597410/465/492, E-mail–desk10@dtemaharashtra.gov.in,
Website: https://dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**No.:DTE/Diploma-Admission Notice/D.Pharm.2022/844 -EN** **Date:- 30/09/2022**

**ADMISSION NOTICE**
**Extension of Last Date For Submission of Application Form**
**FOR FIRST YEAR OF POST HSC DIPLOMA COURSES IN PHARMACY FOR ACADEMIC YEAR 2022-23**

It is Mandatory for all the institutes in the state conducting Diploma in Pharmacy course to obtain approval from Pharmacy Council of India, New Delhi (PCI) to run the course for every academic year. Few existing institutes conducting Diploma in Pharmacy Course have yet not received PCI approval to continue the Diploma in Pharmacy course for the academic year 2022-23. In this regard PCI vide its circular No.14-56/2022-PCI/13107 dated 29/08/2022 informed that the approval process of existing institutes by PCI, for academic year 2022-23 is under process and some more time is required to complete the same.

This Notice is being issued for Extension of Last Date for Online Registration & uploading of documents, Documents Verification and Application Form Confirmation for admissions to First Year of Full Time **Diploma in Pharmacy** in the Government, Government Aided, University Managed and Unaided private educational institutes for the Academic Year 2022-23 in the State of Maharashtra.

**The activities and revised scheduled dates for Maharashtra State / All India *candidates* are as follows.**

| SN | Activity | Schedule | |
|---|---|---|---|
| | | Start Date | Revised Last Date |
| 1. | Online registration of application and uploading of required documents by the Candidate for admission on website by selecting appropriate mode of scrutiny of Application form. (E-Scrutiny Mode/ Physical Scrutiny Mode) (For Maharashtra State/All India candidates) | 09-06-2022 | 07*-10-2022 |
| 2. | Documents verification and confirmation of Application Form for Admission. (E-Scrutiny Mode/ Physical Scrutiny Mode) | 09-06-2022 | 07*-10-2022 |
| * Facility of Online Registration & Documents verification, confirmation of Application Form for Admission to Seats other than CAP Seats shall be continued till the Cut off date of admission. Applications registered, verified & confirmed through e-Scrutiny Mode or Physical Scrutiny Mode after Last Date i.e. 07-10-2022 shall be considered only for Institute Level/Against CAP Seats. | | | |
| 3. | Display of provisional merit list for Maharashtra State/All India candidates on website. | 09-10-2022 | |
| 4. | Submission of grievance, if any, for all type of Candidates | 10-10-2022 | 12-10-2022 |
| 5. | Display of the final merit lists of Maharashtra State/All India candidates on website. | 13-10-2022 | |

Note:

- Information regarding E-Scrutiny Mode and Physical Scrutiny Mode for Online filling and confirmation of Application Form for Admission, Eligibility Criteria for admission, Application fee, Important Instructions for candidates etc. shall be as per the admission notice published by this Directorate vide, DTE/Diploma-Admission Notice/PostHSC2022/468-EN, Dated: 07.06.2022
- The Revised Schedule (if any) and The further schedule for Filling & Confirmation of Option Form for CAP Rounds, CAP Allotment, Acceptance of seat, reporting to Institutes by candidates, cut off date of admission etc. shall be declared after declaration of the Final Merit List and shall be published on website: https://phd22.dte.maharashtra.gov.in
- Help Line No 8857954644, 9028625695 between 10.00am to 06.00pm.

**(Dr. Abhay Wagh)**
Director, Technical Education,
M. S., Mumbai